जा.क्र.मसकें / कंसंयो / जसंनि / १८३ / २०२२
अ. भा. स.कंदपिके संशोधन योजना,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
दिनांक – २७ / १२ / २०२२

| अ.क्र. | विभागाचे नाव | अनामत रक्कम रुपये | दरपत्रक उघडण्याचे दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | अखिल भारतीय समन्वित कंदपिके संशोधन योजना, म.स.कें., वाकवली | ५००/- | दिनांक – २४ / ०१ / २०२३ रोजी दुपारी ३:३० वाजता<br>स्थळ - सभागृह कक्ष मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली |

अटी व शर्ती –

१) ठेकेदाराने मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली यांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या वाकवली विभागातील निरुपयोगी जडवस्तु संग्रह साहित्याची अनामत रक्कमेचा धनाकर्ष ( D.D ) "डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ " या नावाने दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

२) दरपत्रकासोबत पॅनकार्ड, आधार कार्ड च्या छायांकित प्रती आणि अनामत रकमेचा धनाकर्ष ( D.D ) जोडणे आवश्यक आहे, जोडले नसल्यास ते दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाहीत.

३) विक्री ही बंद लखोटा पद्धतीने असून भाग घेणाऱ्या ठेकेदाराने आपली रक्कम नमूद करून लखोटा सिलबंद करून वाकवली कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या टपाल पेटीमध्ये दिनांक २३ / ०१ / २०२३ रोजी सायंकाळी ५:३० पर्यंत कार्यालयीन वेळेपर्यंत टाकण्यात यावेत, उशीरा येणाऱ्या ठेकेदाराचे लखोटे स्विकारण्यात येणार नाहीत.

४) दरपत्रक उघडण्याची प्रक्रिया दिनांक २४ /०१ / २०२३ रोजी ठीक ३:३० वाजता मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली येथील सभागृहात होईल. विक्री प्रक्रिया ही कार्यालयीन पद्धतीचा अवलंबन करून लखोटे उघडण्यात येतील आणि सर्वात जास्त दर असलेल्या ठेकेदारास सदर निरुपयोगी वस्तुंची उचल करण्यासंबंधी कळविण्यात येईल.

कृ । मा । प ।

५) ज्या ठेकेदाराने सर्वात जास्त दर नमूद केलेला असेल त्याने संपूर्ण रक्कम संबंधित विभागास भरणा करून पुढील एक आठवड्याच्या आधी कार्यालयीन वेळेत आणि कार्यालय प्रमुखांच्या समक्ष सर्व निरुपयोगी जडवस्तु संग्रह साहित्याची स्वखर्चाने उचल करून वाहतुक करावयाची आहे.

६) कंदपिके योजना वाकवली या ठिकाणी असलेले निरुपयोगी जडवस्तु संग्रह साहित्य "जेथे आहे जसे आहे " प्रत्यक्ष पाहणी या तत्वावर बंद लखोटा पद्धतीने विक्री करावयाचे आहे. सदरचे साहित्य दिनांक -२८ / १२ / २०२२ ते २२ /०१ / २०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत ( सुट्टीचे दिवस वगळून ) पहावयास मिळेल.

७) विक्री केलेले साहित्याबाबत नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

८) वरील प्रक्रियेप्रमाणे ज्याचे दरपत्रक मंजूर झाले आहे त्याने दरपत्रकात नमुद केलेली पूर्ण रक्कम एक आठवड्याच्या आत भरणा न केल्यास आणि निरुपयोगी कार्यालयीन साहित्य न उचलल्यास त्याची जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल, त्या संबंधित निर्णय घेण्याचे आधिकार हे मा. अध्यक्ष, निरुपयोगी जडवस्तु संग्रह साहित्य विक्री समिती यांनी राखुन ठेवले आहेत.

९) साहित्याची उचल करताना प्रक्षेत्राचे अथवा कार्यालयाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई संबंधितांकडून घेण्यात येईल.

१०) साहित्य विक्री करणे अथवा योग्य किंमत न मिळाल्यास विक्री प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवलेले आहेत.

११) विक्री प्रक्रियेत अपेक्षित रक्कम प्राप्त न झाल्यास सदर विक्री प्रक्रियेत उपलब्ध असलेल्या दरपत्रके धारकांकरवी उघड बोली पद्धतीने निरुपयोगी साहित्याचा लिलाव करण्याचा आधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

१२) सर्वात जास्त दर नमुद केलेल्या पहिल्या तीन ठेकेदारांच्या अनामत रकमेचे धनाकर्ष कार्यालयात जमा करण्यात येतील व उर्वरित इतर सहभागी ठेकेदारांच्या अनामत रकमेचे धनाकर्ष विक्री प्रक्रिया पूर्ण झाल्यावर परत करण्यात येतील.

सहाय्यक उद्यानविद्यावेत्ता
अ. भा. स.कंदपिके संशोधन योजना,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली